Review Of Research
Vol. 2 , Issue. 1 , Oct; 12
ISSN:- 2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# “कामठी नगरपालिकेच्या विविध कार्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास” (कालखंड १९९८–९९ ते २००८–०९)

**ममता पुनम ईलमकर[१] , डॉ. सतिश पुंडलीकराव डुडुरे[२]**
**[१]संशोधनकर्ती**
**[२]मार्गदर्शक , एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी.**

**सांराश –**

प्रस्तुत संशोधनात नागपुर जिल्हयातील कामठी नगरपालिकेचा समस्याचाअभ्यास करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य सत्तांवर सोपविलेली जबाबदारी पूर्ण करण्याकरीता नगरपालिका किती यशस्वी झाल्या आहेत. त्याचे मूल्यमापन करणे. नगरपालिकाचे नियंत्रण आणि स्थानिक नागरिकांचे सहकार्या मुळे नगरपालिकावर होणारे परिणाम याचाही अभ्यास करणे. स्थानिक नागरिकांनी आपल्यातून निवडून दिलेल्या सेवाभावी व्यक्ति ऐवजी सत्तालोभी लोकांचे वर्चस्व नगरपालिकेत आहेत का? सेवाभावी लोकप्रतीनिधी जातीचे राजकारण करून जनतेशी भेदभाव करून सत्ताधारी जनतेच्या मुलभूत सोयी कडे दुर्लक्ष करून प्रशासकीय कार्यात हस्तक्षेप कितपत आहे. संपत्तीचे मुल्याकनांनुसार कर वसुल करण्याकरीता कायद्यामध्ये ज्या तरतूदी आहेत त्याची अमलबजावणी नियमित होते किंवा नाही याचाही अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रस्तावना–**

स्थानिक सत्ता हा विषयच मुळात विकेन्द्रीत विषय आहे. स्थानिक सत्तांची रचना, व्यवस्थापन आणि प्रशासकीय कार्यपद्धती त्यांना घटनेनुसार दिलेल्या मर्यादेचा अनुपातात एक सारखी थोडया कमी किंवा जास्त प्रमाणात असते. परंतु स्थानिक सत्तांची सार्वजनिक आय आणि सार्वजनिक व्यय स्थानिक सत्तांचे उत्पन्न वाढविण्याकरीता आर्थिक निर्मितीचा मार्ग आणि उत्पन्नातुन होणाऱ्या खर्चाचे नियोजन यातभिन्नता दिसून येते ते एक सारखे नसते. स्थानिक सत्तावर अनेक जबाबदारीचा भार असते. ती पूर्ण करण्यासाठी भरीव कामगिरी प्रत्येक नगरपालिकांना करावी लागते.

प्रत्येक नगरपालिकांचे कार्यक्षेत्र, वर्गवारी, भौगोलिक रचना, औद्योगिकरण, शहरीकरण, व्यापारीकरण, समाजिक स्थिती, रस्ते महामार्ग आणि राजकिय वातावरण त्या नगरपालिका क्षेत्रात एक सारखे दिसून येत नाही त्यामुळे नगरपालिकांचा उत्पन्नावर परिणाम होवून भिन्नता दिसून येते. नगरपालिकेचा स्थापने मुळे स्थानिक लोकाच्या अपेक्षेत वाढझाली त्याचा परिणाम आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासावर होत आहे का? प्रशासकीय जवाबदारीत कर्मचाऱ्याच्या बेजवाबदारपणा, भ्रष्टाचारी, स्थानिक नागरीकांची उदासिनता, अशिक्षितपणा तसेच सरकारच्या योजनांची अपूरी माहिती या मुळे सत्ताधारी लोकप्रतिनिधी व प्रशासनाला शासना कडून अनुदान प्राप्त करण्यात अडचणी व अकार्यक्षमता या मुळेही नगरपालिकांचा उत्पन्नात भिन्नता दिसते. या उत्पन्नातून विकास कार्य करण्यात येते पण विकास कार्यात करण्यात येणाऱ्या खर्चाचे नियोजन, कामाचा प्रारूप, सरकारकडून मिळालेल्या अनुदानाची विल्हेवाट प्रत्येक नगरपालिकेत असमानता

दिसून येते. त्यामुळे नगरांचा विकास होत नाही व विकासात्मक कार्यात भिन्नता दिसते समानता दिसत नाही.स्थानिक सत्ता ही लोकांनी लोकाकरीता स्थापित केलेली अधिसत्ता असते ती चालविण्याची जबाबदारी स्थानिक लोकांनी आपल्यातून निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीच्या हाती असते. पण सत्तापक्षात गटबाजी आणि निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीच्या हाती असते. पण सत्तापक्षात गटबाजी आणि विपक्षाची उदासिनता प्रत्येक स्थानिक संस्थेत भिन्न चित्र दिसून येते याचाही प्रभाव आर्थिक परिस्थितीवर पडतो त्यामुळे विकासात्मक कार्य दिसून येत नाही अशा परिस्थितीत कामठी नगरपालिकेच्या आर्थिक दृष्टिकानातून तुलनात्मक अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली व विषयाचे महत्व वाढले.

**कामठी नगरपालिकेच्या समस्याः-**

शासन कोणतेही असो, केन्द्रशासनापासून तर ग्रामपंचायत पर्यंत या संस्था लोकांच्या माध्यमातून लोकांकरीता स्थापित झालेल्या संस्था आहे. या संस्था लोकशाही मार्गाने जनतेद्वारे आपल्यातून निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीच्या मार्फत चालविण्यात येते आणि प्रशासन याला नियमाच्या चौखटीत आखून नियोजन करतात त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन असे गट निर्माण होतात. लोकप्रतिनिधी आपल्या विचाराने व नागरिकांच्या हिताच्या दृष्टिने स्थानिक सत्तेच्या माध्यमाने कार्य करण्यास प्रवृत्त असतात. तर प्रशासन नियमाच्या अधिन राहून व उपलब्ध निधीच्या आधारे कार्य करण्याचा प्रयत्न करतात. सत्ता कोणतीही असो ती कोणत्याना कोणत्या शासनाच्या नियंत्रणा खाली आणि ठरविलेल्या नियमानुसार कार्य करून उत्तरदायी असावे लागते. अशाच पध्दतीने नागरिक स्वराज्य संस्था राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली त्यानी ठरवून दिलेल्या महाराष्ट्र नगरपालिका कायदा १९६५ च्या वैधानिक नियमानुसार लोकप्रतिनिधी व प्रशासनाला कार्य करावे लागते. ७३ व ७४ व्या घटनेत शासनाने वेळोवेळी अनेक दुरूस्त्या केल्या आहे. आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम बनविण्यासाठी घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला आहे.

स्थानिक संस्था लोकोपयोगी संस्था असून लोकांच्या गरजेनुसार कार्यासाठी तत्पर असावे लागते. स्थानिक लोकांच्या गरजा अनेक असतात त्या गरजा पूर्ण करतांना अनेक गरजा निर्माण होतात. त्यात नगरपालिकेची गरज, नगरपालिकेतील प्रशासनाची गरज, लोकप्रतिनिधींची गरज, अशा गरजा वाढल्याने समस्या निर्माण होतात. समस्याचा विचार केल्यास केन्द्रशासन, राज्यशासन किंवा स्थानिक शासन यांच्या समोर पैशाच्या अभावने अनेक समस्या निर्माण झाल्या आहे. त्यामुळे नियमित व नियोजित वैधानिक कार्य होवू शकत नाही.

त्या समस्या संशोधकाने पुढील विभागणी करून मांडल्या आहे.

१) आर्थिक दृष्टिकोनातून समस्या
२) नगरपालिका व प्रशासनाच्या दृष्टिकोनातून समस्या
३) लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षाच्या दृष्टिकोनातून समस्या
४) स्थानिक नागरिकांच्या दृष्टिकोनातून समस्या
५) संशोधकाच्या दृष्टिकोनातून समस्या.

कामठी नगरपालिकेतील काही प्रमुख व्यक्ति, सामाजिक नागरिक, लोकप्रतिनिधी व प्रशासनातील घटक वर्गाच्या संपर्कातून काही मते व विचारंची माहिती संकलित करतांना सर्वच घटक वर्गानी आपआपल्या पध्दतीने समस्या मांडण्याचा प्रयत्न केला व ऐकमेकांच्या चुका विषयी माहिती दिली अशावेळी संशोधकानेही आपल्या दृष्टिकोनातून शोध घेण्याचा प्रयत्न केला असता त्यात काही साम्य दिसू लागले तर काही ठिकाणी थोडा फरक दिसून आल्याने स्वतःचे मत प्रकट करावे अशी संशोधकाची धारणा झाली.

१. कामठीनगरपालिका लोकांच्या पैशातून लोकांच्या माध्यमाने लोकांकरीता कार्य करणारी घटनात्मक संस्था आहे. ती एका व्यक्तिची नसून सर्वांची संस्था आहे.

२. कामठीनगरपालिका लोकशाही पध्दतीने लोकप्रतिनिधी मार्फत चालणारी संस्था आहे. पण लोकप्रतिनिधी वेगवेगळया पक्षाचे असल्यामुळे सत्तेवर कोण असावे यातच चढाओढ सुरू असते.
३. कामठीनगरपालिकेतील निवडणूक पैसा, जातीवाद, स्थानिक गटबाजी, घराणेशाही, व्यक्तिगत प्रभाव इत्यादीने निवडणूक होत असल्यास सभ्य, साधारण, शिक्षित व गरिबांना प्रतिनिधत्व करण्याची संधी मिळत नाही.
४. कामठीस्थानिक जनता उम्मेदवार निवडतांना त्यांची कर्तव्य, राजकिय निष्ठा, इमानदारी व नागरिक प्रश्नांचा अभ्यास त्याला आहे किंवा नाही याचा सखोल विचार करत नाही.
५. कामठीनविन आरक्षण धोरणामुळे नगरपालिकेतील नेतृत्व ज्याच्या कडे आहे त्यात नेतृत्व क्षमता, नेतृत्व गुण, अभ्यासक, वैचारिक, मनमिळावू असावे लागते. अशावेळी अयोग्य व्यक्तिच्या हाती सत्ता सूत्रे असल्यास समस्या निर्माण होते.
६. कामठीनगरपालिकेतील कर्मचारी व अधिकारी यांचे नातेवाईक स्थानिक सत्तेत प्रतिनिधीत्व करत असतांना तेथील कर्मचारी व लोकप्रतिनिधीचे समिकरण बदलेले दिसते. तेव्हा नागरिकांच्या हिताचे कार्य न करता स्वत:चे उद्दिष्ट पूर्ण होणारे योजनेची अमलबजावनी करण्यात उत्साहीत असतात.
७. कामठीनगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या कामात राजकिय हस्तक्षेप मोठया प्रमाणावर होते कारण स्थानिक नेते व कर्मचारी स्थानिक रहवासी असल्याने एकमेकांच्या संमतीने कार्य करतांना दिसतात.
८. कामठीवाढती लोकसंख्या, शहरीकरणामुळे नागरिक सुविधा पुरविण्यात नगरपालिकांना नेहमीच समस्येला समोर जावे लागते. त्यामुळे असंतोष निर्माण होते.
९. कामठीशहरात पाणी पुरवठाची व्यवस्था नद्या, नैसर्गिक किंवा कृत्रिम तलावात पाणी साठवणूक करून करण्यात येते. परंतु स्थानिक नागरिक त्याठिकाणी आंघोळ करणे, कपडे धुणे, जनावरे धुणे इत्यादी मुळे पाणी दुषित होते.
१०. कामठीशहरात बिनापरवानगीने अनधिकृत बांधकाम अनेक ठिकाणी होतांना दिसते. त्याचा परिणाम नगरपालिकांचा उत्पन्नावर होते. लोकप्रतिनिधी व कर्मचारी त्याकडे दुर्लक्ष करतात.
११. कामठीशहरात उदरनिर्वाह, मोलमजुरी या उद्‍देशाने येवून झोपडी बांधून राहतात. त्यामुळे लोकांची गर्दी वाढून लोकसंख्येत वाढ होते त्याचा परिणाम नगरपालिकेला जनगणने वास्तविक आकडेवारी, सोयी सुविधाची कमतरता यावर होते. व शहरात गलिच्छ पणा निर्माण होवून पर्यावरण नष्ट होते.
१२. कामठीनगरपालिका क्षेत्रात बाजाराची व्यवस्था एकाच ठिकाणी असल्याने जागेच्या कमतरते मुळे नविन व्यवसाय करणारे अतिक्रमण करून दुकाने मांडतात, किंवा दुसऱ्यांच्या खाली जागेवर आणि रस्त्याच्या आजुबाजुला दुकाने लावतात त्यामुळे फुटपाथ, रस्ते अरूंद होवून शहराचे सौंदर्य नष्ट होते.
१३. कामठीनैसर्गिक आपत्ती टाळण्यासाठी यंत्रणेचा अभाव प्रत्येक नगरपालिकेत दिसून येते.
१४. कामठीनगरपालिका द्वारे शहराची रचना नियोजनबध्द पध्दतीने न केल्याने विकास योग्य पध्दतीने होत नाही. शहरात व्यवसाय आणि वास्तव्य करण्याच्या उद्‍देशाने अनेक अनधिकृत बांधकाम सुरू असते त्यामुळे लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणात उत्पन्नात वाढ होत नाही. त्यामुळे शाळा, उद्याने, दवाखाने, खेळ मैदाने, बाजार या सारख्या सुविधा सोयीस्कर उपलब्ध राहत नाही. अशा कारणाने नगरपालिकेवर मोर्चे व मोठया राजकिय हस्तक्षेपामुळे समस्या निर्माण होते.

**निष्कर्ष:-**

कामठीतील नागरिकांच्या मुलभुत प्रश्नांची सोडवणूक व सोयी सुविधांची उपलब्धतता कोणतीही एक केन्द्रभूत किंवा मध्यवर्ती शासन करू शकत नाही. तसेच लोकांच्या कल्यानासाठी लोकशाही मार्गाने पायाभुत व विकासात्मक कार्य करण्यासाठी स्थानिक

स्वराज्य संस्था निर्माण करणे काळाची गरज आहे. अनेक कायद्यात बदल व समित्या नियुक्त करून ही पंचायत राज्य व्यवस्थेला योग्य मार्ग शोधता आले नाही. व स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांची विल्हेवाट लावता आली नाही.

**संदर्भ ग्रंथसूची**



| अ. क्र. | लेखक | ग्रंथाचे नाव | प्रकाशक |
|---|---|---|---|
| ०१ | प्रा. सु.रा. ओझरकर | राजस्व | विद्या प्रकाशन |
| ०२ | प्रा.देव /झामरे | राजस्व | पिंपडापुरे प्रकाशन |
| ०३ | एच.एस. अग्रवाल | सार्वजनिक वित | रतन प्रकाशन |
| ०४ | काळे/पाटिल | सार्वजनिक वित | लव्हली प्रकाशन |
| ०५ | डॉ. बोधनकर | संशोधन पद्धती | साईनाथ प्रकाशन |
| ०६ | डॉ. भांडारकर | संशोधन पद्धती | दत्त प्रकाशन |
| ०७ | डॉ. वा.भा. पाटिल | पंचायत राज | विद्या प्रकाशन |
| ०८ | अवध किशोर सक्सेना | राजस्व के सिद्धांत | एस.चांद कंपनी |
| ०९ | प्राचार्य. उखळकर | अंकेक्षणाचे सिद्धांत | विद्या प्रकाशन |
| १० | प्रा. व्ही.बी. पाटील | पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | के.सागर प्रकाशन |
| ११ | प्रा. अ.ना. कुलकर्णी | भारतातील स्थानिक स्वशासन | विद्या प्रकाशन |
| १२ | V. N. Chawla | Studies in Local self Government in India | |
| १३ | S.R. Maheshwari | Local Government in India | |
| १४ | S. R. Nigam | Local Government in India | |
| १५ | D. M. Mithani | Modern Public Finance | Himalaya Publish |
| १६ | डॉ. एस.के.हळबे/ डॉ. जी.डी. लोढे | सार्वजनिक आयव्यय | मंगेश प्रकाशन |
| १७ | ल.ग. बापट | भारतीय राजस्व | आयडीयल बुक सर्व्हिस, पुणे |
| १८ | प्रा. सौ. डॉ. निर्मल भालेराव | भारतातील सार्वजनिक आयव्यय आणि नियोजन | निराली प्रकाशन |
| १९ | डॉ. देसाई | सार्वजनिक वित्तव्यवहार | निराली प्रकाशन |